# जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभा दिनांक ०७.०४.२०१६ रोजीचे कार्यवृत्त भाग-१

जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीची सभा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, जिल्हा परिषद, अमरावती येथे दिनांक ०७.०४.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सन्मा. उपाध्यक्ष श्री. सतीश हाडोळे, सन्मा. सभापती, बांधकाम व शिक्षण श्री. गिरीष कराळे, सन्मा. सभापती महिला व बाल कल्याण सौ. वृषालीताई विघे, सन्मा. सभापती कृषी व पशुसंवर्धन सौ. अरुणाताई गोरले, सन्मा. सभापती समाजकल्याण सौ. सरीताताई मकेश्वर तसेच सन्मा. जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, खाते प्रमुख, उप अभियंता सर्व व पत्रकार यांचे सभेच्या उपस्थिती निमित्ताने स्वागत केले व सचिव यांना सभा सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेला उपस्थित मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्मा. सभापती, मा. मु.का.अ. यांचे मी स्वागत करतो. आजचा पहिला विषय मागिल सभा दिनांक १० मार्च २०१६ चे कार्यवृत्तास मान्यता देणे. अनुपालनाच्या प्रति सर्व सन्मा. सदस्यांना देण्यात आलेल्या आहेत.

**मा. उपाध्यक्ष :-** मागील बैठकीस कार्यकारी अभियंता श्री. पोटफोडे हे सुटीवर होते. मागील सभेचे अनुपालन पेंडींग आहे. पहिले ते अनुपालन घ्या नंतरच १० मार्च २०१६ च्या बैठकीचे कार्यवृत्त मंजुरीचा विषय नंतर घ्यावा.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** अनुपालन मुद्दा क्रमांक : १ - लोहगांव येथील सिंचन तलावाची चौकशी करुन वस्तुस्थिती सभागृहात ठेवावी. लोहगांव येथील सिंचन तलावाची चौकशी पूर्ण होईपर्यत संबंधित एजन्सीला उर्वरीत रक्कम देण्यात येऊ नये.

**मा. उपाध्यक्ष :-** यामध्ये चौकशी समिती कुठे नेमण्यातआली आहे.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** चौकशी समिती नेमण्यात आली असून त्याबाबची नस्ती मा. अध्यक्ष यांचेकडे सादर केलेली आहे.

**मा. श्री. बापुरावजी गायकवाड, सदस्य जि.प. :-** या अगोदर वरुड मध्ये चौकशी समिती नेमली होती त्यामध्ये यवतमाळचे कार्यकारी अभियंता साहेब हे होते. त्याचा अहवाल मिटींगमध्ये आला नाही.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** अनुपालन मुद्दा क्रमांक : २ - सोमवार खेडा येथील शेतकऱ्यांचे भुसंपदानाचे पैशे का मिळाले नाही. याबाबत माहिती घेवून पुढील सभेत ठेवावी.

**श्री. खंडारे उप अभियंता, स्था. स्तर :-** सोमवारखेडा १ व २ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे सादर केला आहे परंतु जिल्हा परिषदेकडून मान्यता अप्राप्त आहे.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** शेतकऱ्यांना भुसंपदानाचा मोबदला देण्यासाठी यासभेमध्ये ठराव झाला होता. त्यांना केव्हा पर्यत मोबदला मिळणार आहे.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** भुसंपादनासाठी निधी मागणी केली आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी निधी उपलब्ध करुन देणेबाबत आश्वसत केले आहे.

**मा. श्री. सदाशिव खडके, सदस्य जि.प. :-** माझी विनंती आहे की, या जिल्हास्तरावरील बैठकीस कोण-कोण हजर आहेत. कोणते अधिकारी बैठकीस हजर राहणे अपेक्षित होते आणि कोणत्या अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** आजच्या बैठकीला कोणत्या अधिका-यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत याचा पहिले आढावा घ्या.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** कार्यकारी अभियंता मजीप्रा, कार्यकारी अभियंता अमरावती मध्यम प्रकल्प, कार्यकारी अभियंता उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्रमांक १, कार्यकारी अभियंता उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्रमांक २, धामणगांव रेल्वे, कार्यकारी अभियंता वीज वितरण कंपनी, अमरावती हे गैरहजर आहेत.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** जलव्यवस्थापन समिती ही जिल्हयाची समिती आहे. प्रोटोकॉलनुसार हे अधिकारी हया बैठकीला असणे गरजेचे आहेत. नाहीतर फक्त जिल्हा परिषद अधिकाऱ्यांची बैठक घ्या. आजच्या बैठकीला जबाबदार अधिकारी नाहीत. मजीप्राचे अधिकारी, विद्युत कंपनीचे अधिकारी नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा आजच्या बैठकीत ठराव घ्या आणि शासनास पाठवा.

**मा. अध्यक्ष जि.प. :-** गैरहजर अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** स्थानिक स्तरची किती कामे सुरु आहेत.

**कार्यकारी अभियंता सिंचन :-** साधारण तिन ल.पा.यो.कामे सुरु आहेत.दोन को.पं.ब.कामे निधी अभावी सुरु होवु शकली नाही.आणि १२ ल.पा.यो.कामे वाढीव भुसंपादन निधीचे मागणीकरीता आहेत.

**मा. सौ. सुरेखाताई ठाकरे सदस्या जि.प. :-** फंडीग पूर्ण आहे काय ? सोमवार खेडाचे काम का बर लेट होत आहे. शेतकऱ्यांना भुसंपादानाचे निधी का देत नाही. जलयुक्त शिवार, सिंमेट नालाबांध, नाला खोलीकरण किती कामे आहेत. CNB इ. कामांची यादी आम्हाला द्या.

**मा. मु.का.अ.** :- गेल्या वर्षी २५३ गांवे होती. मा. जिल्हाधिकारी साहेब यांचेशी आजच चर्चा झाली. एक-एक गांव पूर्ण करीत जावे अशी त्यांची संकल्पना आहे. गेल्यावर्षी आपल्याबद्दल निरनिराळया कामात गैरसमज झाले. आपण कामाला हात लावला नाही ही वस्तुस्थिती आहे. Constituency निहाय यादी द्या असे त्यांचे म्हणणे आहे. माझा प्रस्ताव असा आहे, पाच महिन्याआधी प्रशासकीय कामे संपावे. मा. सहारिया साहेब राज्य निवडणूक आयुक्त यांनी सुध्दा आपणास तशा सूचना केलेल्या आहेत. सप्टेबर ऐंन्ड हाच आपला मार्च ऐंन्ड असे समजून आपल्याला कामे करावी लागणार आहे. ७० - ७२ कोटीचे प्रस्ताव तयार केलेले आहेत ते आपल्या हाती घ्यावे लागतील. सर्व प्रथम टंचाई मधील गांवे घ्यावे लागतील. पैसे उपलब्ध आहे. आपण लाभ उठवायला पाहीजे. प्रत्येकाला विचारुन आपण नियोजन करु. महत्वाकांक्षा ठेवून जर आपण हे काम केले तर ते होवू शकते.

**श्री. पोटफोडे का.अ. (सिंचन) :-** कार्यकारी अभियंता सिंचन यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडुन प्राप्त झालेल्या जलयुक्त शिवार योजने अंतर्गतची सन २०१५-१६ व सन २०१६-१७ च्या यादीचे खालील प्रमाणे वाचन केले.

**जलयुक्त शिवार योजने अंतर्गत मा.जिल्हाधिकारी यांचे कडुन प्राप्त अमरावती जिल्हयातील सन २०१५-१६ मधील तालुका निहाय गावाची यादी.**

**तालुका :-अमरावती**

| अ.क्र. | गावाची नांवे | अ.क्र | गावाची नांवे | अ.क | गावाची नांवे | अ.क्र | गावाची नांवे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रसुलपुर | २ | चिचखेड | ३ | करजगांव | ४ | डवरगांव |
| ५ | यावली शहीद | ६ | नरसिंगपुर | ७ | नांदुरा (ल.) | ८ | धामणा |
| ९ | कठोरा (बु.) | १० | वाघोली | ११ | पिपंळखुटा | १२ | भानखेडा (बु) |
| १३ | अमळापुर | १४ | धानोरा (कोकाटे) | १५ | डिगरगव्हाण | १६ | कठोरा(खु.) |
| **१७** | **शेवती** | **१८** | **मासोद** | **१९** | **पोहरा** | २० | भानखेडा (खु.) |
| २१ | उदखेड | | | | | | |

**तालुका :-भातकुली**

| अ.क्र. | गावाची नांवे | अ.क्र | गावाची नांवे | अ.क | गावाची नांवे | अ.क्र | गावाची नांवे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विर्शी | २ | कुमागड | ३ | नवथड | ४ | धामोरी |
| ५ | निरुळगंगामाई | ६ | जळतापुर | ७ | कळमगव्हाण | ८ | साऊर |
| ९ | रामा | १० | खालाकोणी | ११ | म्हैसपुर | १२ | सायत |
| १३ | जळका हिरापुर | १४ | नारायणपुर | | | | |

**तालुका :-तिवसा**

| अ.क्र. | गावाची नांवे | अ.क्र | गावाची नांवे | अ.क | गावाची नांवे | अ.क्र | गावाची नांवे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मार्डी | २ | भिवापुर | ३ | माळेगाव | ४ | कु-हा |
| ५ | चेनुष्ठा | ६ | वाढोणा | ७ | सातरगांव | ८ | शिरजगांव |
| ९ | शेदोळा (खु.) | १० | तिवसा | ११ | तळेगांव (ठा.) | १२ | अनकवाडी |

**तालुका :-चांदुर रेल्वे**

| अ.क्र. | गावाची नांवे | अ.क्र | गावाची नांवे | अ.क | गावाची नांवे | अ.क्र | गावाची नांवे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जळका जगताप | २ | सालोरा | ३ | उमरपुर | ४ | पातरगांव |
| ५ | थुंगाव | ६ | आमला | ७ | शिरजगांव (को.) | ८ | कारला |
| ९ | टोंगलाबाद | १० | कळमगांव | ११ | मांजरखेड (क) | १२ | चांदुर रेल्वे |
| **१३** | **जवळा धोतरा** | **१४** | **मालखेड** | **१५** | **एकपाळा** | **१६** | **सांवगी (म.)** |
| **१७** | **वाही** | | | | | | |